**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

1. **कृषी, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, पायाभूत सुविधा आणि ऊर्जा क्षेत्रावर 'मित्र'ने विशेष लक्ष केंद्रीत करावे: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश**

2. **आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यापेक्षा जास्त वाढवण्यासाठी आपला पाठिंबा राहील असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांचं प्रतिपादन.**

3. **नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांच्या हस्ते राज्यस्तरीय रानभाजी महोत्सवाचं उद्घाटन, उद्या महोत्सवाचा शेवटचा दिवस**

4. **अप्पर वर्धा, बेंबळा आणि पेंच तोतलाडोह सह विदर्भातील सर्व प्रकल्पांच्या धरणसाठ्यात वाढ**

****

**मित्र**

राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रीलीयन डॉलर होण्याचं उद्दिष्ट साध्य करतानाच 'मित्र Maharashtra Institution for Transformation' ने कृषी, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, पायाभूत सुविधा, ऊर्जा या क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रीत करावं जेणेकरून नागरिकांना त्याचा फायदा होईल आणि राज्याच्या विकासाला देखील मोठा हातभार लागेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत केलं .यावेळी महाराष्ट्र जिल्हास्तरीय विकासास चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता बळकटीकरण प्रकल्प, कृष्णा भिमा खोऱ्यातील विशेषतः कोल्हापुर आणि सांगली जिल्ह्यातील पूर परिस्थिती नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रतीसाद क्षम विकास कार्यक्रमाचा आरंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत करण्यात आला. वर्षा निवासस्थानी 'मित्र'च्या नियामक मंडळाची बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. महाराष्ट्र आर्थिक

विकास सल्लागार परिषदेनं शिफारस केलेल्या जिल्हास्तरीय विकासाला चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता बळकटीकरण करणे तसेच जिल्ह्यांना विकास आणि उत्पन्न वाढीचा केंद्रबिंदू करण्याच्या केंद्र शासनाच्या धोरणास अनुसरुन राज्यात महाराष्ट्र जिल्हास्तरीय विकासास चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता बळकटीकरण प्रकल्पाचा शुभारंभ यावेळी करण्यात आला. या प्रकल्पाला जागतिक बँकेकडून १५६२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे.

**नशा मुक्त भारत अभियान**

सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयातर्फे आज देशभरात नशा मुक्त भारत अभियाना अंतर्गत अंमली पदार्थांच्या सेवना विरुद्ध सामूहिक शपथ ग्रहण सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्री डॉ वीरेंद्र कुमार यांनी आज नवी दिल्लीत उपस्थितांना शपथ दिली. 'विकसित भारत का मंत्र, भारत हो नशे से स्वतंत्र' ही या वर्षाची संकल्पना आहे. या कार्यक्रमाला संबोधित करताना डॉ वीरेंद्र कुमार म्हणाले की आतापर्यंत 11 कोटींहून अधिक लोक नशा मुक्त भारत अभियानाचा भाग बनले आहेत. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील सरकारं, शाळा, महाविद्यालये, नॅशनल कॅडेट कॉर्प्स, नेहरू युवा केंद्र संघटना आणि इतर सार्वजनिक संस्थांचे विद्यार्थी आणि प्राध्यापकांसह देशभरातील एक कोटीहून अधिक लोक आजच्या कार्यक्रमात ऑनलाइन सहभागी झाल्याची माहिती त्यांनी दिली. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयानं 15 ऑगस्ट 2020 रोजी नशा मुक्त भारत अभियान सुरु केलं होतं. आणि ऑगस्ट २०२३ पासून देशभरातील सर्व जिल्ह्यांमध्ये ते लागू करण्यात आलं आहे.

हिंडेनबर्ग

हिंडेनबर्ग रिसर्चने केलेले आरोप सेबी म्हणजे भारतीय रोखे आणि विनिमय मंडळानं फेटाळले असून या पार्श्वभूमीवर शांत चित्ताने प्रतिक्रिया द्यावी, असं आवाहन गुंतवणूकदारांना केलं आहे. हितसंबंधांमुळे निर्माण होणारे पेचप्रसंग हाताळण्यासाठी सेबीकडे पुरेसे नियम आणि सक्षम अंतर्गत यंत्रणा असल्याचं

सेबीने म्हटलं आहे. देशाच्या भांडवली बाजारांची विश्वासार्हता आणि विकास याप्रति वचनबद्ध असल्याची ग्वाही सेबीने दिली आहेद.रम्यान हिंडेनबर्गच्या आरोपांचा प्रतिवाद करताना सेबी अध्यक्ष माधवी पुरीबुच यांनी अनेक बाबी - स्वीकारल्या असून त्यामुळे त्यांच्याविषयी नवे प्रश्न निर्माण झाले असल्याचं ट्विट आज हिंडेनबर्गने केलं आहे.

शरद पवार आरक्षण

महाराष्ट्रात आरक्षणा संबंधाने दोन समाजात कटुता निर्माण होणार नाही, याची काळजी सर्वांनी घ्यायला हवी, यासाठी मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावून यावर तोडगा काढावा असं राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. राज्यातलं सामाजिक वातावरण व्यवस्थित ठेवण्याची काळजी सर्वांनी घ्यायला हवी असं आपल्याला वाटतं, यासाठी आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना सर्वपक्षीय बैठक बोलावून तोडगा काढण्याविषयी सुचवलं असल्याच पवार म्हणाले. राज्यात सौहार्द निर्माण करण्यासाठी या बैठकीत एकमताने जो निर्णय होईल तो आपल्याला मान्य असेल असंही पवार यांनी सांगितलं. आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यापेक्षा जास्त वाढवता येणार नाही हा न्यायालयाचा निर्णय आहे. त्यामुळे राज्यातल्या सर्व पक्षांनी मतभेद विसरून केंद्र सरकारकडे आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणी करावी, आरक्षणाची मर्यादा वाढवल्यास आपल्या पक्षाचा याला पाठिंबा असेल, असंही पवार म्हणाले.

**मेफेड्रोन**

महसूल गुप्तचर संचालनालयानं काल नागपूर इथं मेफेड्रोन कारखान्यावर छापा टाकून सुमारे ७८ कोटी रुपये किमतीचे ५२ किलो मेफेड्रोन द्रव स्वरूपात जप्त केले आहे. यासोबत कच्चा माल आणि उपकरण देखील जप्त करण्यात आली आहेत. शहरातल्या एका निर्माणाधीन इमारतीत मेफेड्रोनचं उत्पादन सुरू असल्याची माहित मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी चौघांना अटक करण्यात आली असून, त्यांना महसूल गुप्तचर संचालनालयाच्या कोठडीत पाठवण्यात आलं आहे.

पानमांजर

दुर्मिळ होत असलेल्या वनस्पतींच्या जतन आणि संवर्धनावर भर देण्याचे निर्देश देत पानमांजर, गिधाड, रानम्हैस यांच्या प्रजनन केंद्रासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य वन्य जीव मंडळाच्या बैठकीत आज मान्यता दिली. यावेळी नागपूर नजीक पेंच इथं पानमांजर, नाशिक इथं गिधाड आणि गडचिरोली इथं रान म्हैस प्रजनन केंद्र उभारण्याविषयी चर्चा झाली. दुर्मिळ होत चालेल्या वन्यजीवांच्या संवर्धनासाठी ही केंद्रे उपयुक्त ठरतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. वन मंत्री सुधीर मुनगंटीवार दुरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून बैठकीत सहभागी झाले होते. दरम्यान, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कुटुंबातील सदस्याला वनमजुर म्हणून सामावून घेण्याचा निर्णय देखील मुख्यमंत्र्यांनी घेतला. सर्पदंशामुळे मृत्यू झालेल्या शेतमजुरांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विम्यातून लाभ देण्याचे तसेच सर्पदंशावर तात्काळ उपचार मिळावेत यासाठी क्लिनिक ऑन व्हील उपक्रम सुरू करण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्री शिंदे यांनी आज मुंबईत दिले.

मनपा आरोग्यविषयक कारवाई

नागपूर महानगरपालिकेनं आरोग्यास धोकादायक अशा खुल्या भुखंडाच्या मालकांविरुद्ध कडक कारवाईला सुरुवात केली आहे. या अंतर्गत ११ खुल्या भुखंडाच्या मालकांविरुद्ध FIR दाखल करण्यात आली आहे.रिकाम्या भुखंडा मध्ये मोठ्या प्रमाणात पावसाचं पाणी साचल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला असुन किटकजन्य आजारामुळे तिथल्या नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्यान ही कारवाई करण्यात आली. नागपूर शहरात डेंग्यू आणि चिकनगुनियाचा वाढता प्रसार रोखण्याच्या दृष्टीनं नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाद्वारे शहरातील ताप रुग्णांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. झोन निहाय आशा स्वयंसेविकाद्वारे सुरु असलेल्या सर्वेक्षण अभियानात आतापर्यंत ३२ हजार १२१ घरांचं सर्वेक्षण करण्यात आलं आहे. दरम्यान डेंग्यू आणि चिकनगुनिया नियंत्रणासाठी आरोग्य विभाग सज्ज असून, नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस

"कोरडा दिवस" म्हणून पाळावा असं आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केलं  आहे.

***गेल्या काही दिवसापासून पावसामुळे नागपूर शहरातल्या काही भागांमध्ये इवन काही घरांमध्ये सुद्धा पाणी जमा झालेला आहे  त्यामुळे जे डासांची उत्पत्ति होऊन डेंगू चिकनगुनिया सतत चे  जे आजार आहेत, यांच्या प्रमाणात काही प्रमाणात वाढलेले आहेत.  याला रोकथाम   करण्यासाठी सगळ्यांनी काळजी घेणे अतिशय आवश्यक आहेझालेला पाणी ड्रेन सार्वजनिक ठिकाणी जमा ., करून घेण्यासाठी महानगरपालिकेची टीम कार्यरत आहे.  याचबरोबर आपापल्या घरामध्ये जे वेगवेगळे ठिकाण असते जसं की तुम्ही काही घरी काही टायर्स पळलेले असतील कुलर ची टाकी आहे, रांजण आहे, करवंटी आहे, अशा ठिकाणी अशा ठिकाणी जे पाणी जमा होतं या ठिकाणी सुद्धा डासांची उत्पत्ती होते ही फीडिंग रोकण्यासाठी आपल्या सगळ्यांनी एक दिवस तरी कोरडा दिवस पाळला पाहिचे डासांचा डक होणार नाही यासाठी जे आवश्यक काळजी आहे ती घेतली पाहिजे.***

**रानभाजी महोत्सव**

औषधी गुणतत्वे असणारा रानमेवा प्रत्येकाला उपलब्ध व्हावा आणि  शेतकरी गटांना या रानभाज्यांच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहचण्याची संधी मिळावी, या उद्देशानं जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय रान महोत्सवाचं उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ.विपिन इटनकर यांच्या हस्ते आज करण्यात आलं.सर्वसामान्यांना रानमेवा उपलब्ध होण्याच्या उद्देशाने कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा- आत्मा आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीनं या महोत्सवाचं  आयोजन करण्यात आलं  आहे. केना, कुंजरु, खापरखुटी, पाथरी, कपाळफोडी, टाकळा/तरोटा, मायाळू भाजी, कुरडुची भाजी, शेवळा, करटोली, काटेमाठ, हादगा, दिंडा भाजी, शेवगा, अघाडा, कमळून भाजी, आंबाडी भाजी, तसेच हंगामी फळे या महोत्सवात ग्राहकांसाठी उपलब्ध होत आहे.

**विकास ठाकरे परिषद**

नागपूर शहरात गेल्या दहा वर्षातील अनियोजित रस्तेबांधकामामुळे पाणी तुंबत आहे. शहरातील कचरा उचलला जात नाही. त्यामुळे अनेक कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव होत आहे.महानगरपालिका प्रशासनाला शासनाचा निधी मिळत असून देखील त्याचा सर्वसामान्यांना फायदा होत नाही असा आरोप नागपूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष आणि पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी आज नागपूर इथं पत्रकार परिषदेत केला. सिमेंट रोडच्या दोन्ही बाजूला पाण्याचा निचरा होण्याची सोय नसल्यामुळे पावसाचे पाणी नाल्यांमध्ये न जाता सरळ नागरिकांच्या घरात घुसत आहे. सिमेंट रस्त्याच्या आणि गटर लाईनच्या बांधकामासाठी जबाबदार असलेल्या अभियंत्यांना या कामाबाबत जाब विचारला पाहिजे अशी मागणी देखील ठाकरे यांनी यावेळी केली.

**मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शन**

माहिती आणि प्रसारण मंत्रालया अंतर्गत साजरा करण्यात येत असलेल्या 'आजादी का अमृत महोत्सवा'चा एक भाग म्हणून विभाजन 'विभीषिका स्मृती दिवस' आणि 'हर घर तिरंगा' अभियानानिमित्त 'मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचं' आयोजन 13 ते 15 ऑगस्ट पर्यंत सीताबर्डी नागपूरच्या मेट्रो जंक्शन इथं करण्यात आलं आहे. नागपूर महानगरपालिका, केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय नागपूर आणि महा मेट्रो नागपूर तर्फे हा संयुक्त उपक्रम असून, या प्रदर्शनासाठी प्रवेश निशुल्क आहे.

**लाख लागवड कार्यशाळा**

केंद्रीय वाणिज्य आणि व्यापार मंत्रालयाच्या अंतर्गत नागपूरच्या सिव्हिल लाईन्स इथल्या विदेश व्यापार महासंचालनालय D G F T यांच्या वतीनं चंद्रपूरच्या नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय इथं 14 ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी 11 वाजता' लाख लागवड आणि निर्यात' या विषयावरील कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यशाळेचं उद्घाटन राज्याचे वनमंत्री तसंच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुंनगंटीवार यांच्या हस्ते होणार आहे. या

कार्यशाळेत, डॉ. ननिता बेरी, प्रमुख शास्त्रज्ञ, उष्णकटिबंधीय वन संशोधन संस्था- T F R I जबलपूर यांचे 'लाखेच्या लागवडीच्या वैज्ञानिक पद्धती, मूल्यवर्धनाची व्याप्ती आणि विपणन तंत्र' यावर व्याख्यान होईल.लाख आणि इतर लघु वनोपजांची लागवड, संकलन, प्रक्रिया आणि व्यापारात सहभागी असलेल्या सर्वांसाठी कार्यशाळेला उपस्थित राहण्याचं आवाहन विदेश व्यापार सहाय्यक महासंचालक स्नेहल ढोके यांनी केलं आहे.

**इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या यंदाच्या शैक्षणिक वर्षात ३८ लाख विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यापीठात 14 ऑगस्ट पर्यंत विद्यार्थ्यांना पदवी पदव्युत्तर पदविका स्तरावर प्रवेश घेता येणार आहे. विद्यापीठात ३५० पेक्षा अधिक अभ्यासक्रम असून त्यांची माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. यासाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन प्रवेशासंबधीचा सर्व तपशील उपल्बध असल्याची माहिती इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ नागपूरचे विभागीय संचालक डॉ. लक्ष्मण कुमारवाड यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

**हवामान/जलसाठा**

विदर्भातील नागपूर, अमरावती, भंडारा आणि गोंदिया या जिल्हयांमध्ये आज मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. या जिल्हयांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला. तर उर्वरित जिल्हयांमध्ये हवामान सामान्य राहण्याचा अंदाज आहे. उद्या चंद्रपूर , गडचिरोली आणि गोंदिया इथं पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. राज्यातील पावसाचा जोर काहीसा ओसरला, तरी विदर्भातील सर्वच प्रकल्पांच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाल्याने धरणसाठ्यात वाढ झाली आहे. वैनगंगा, वर्धा आणि बेंबळा नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागपूर विभागातील मोठ्या प्रकल्पांमध्ये ७४.११ टक्के, तर अमरावती विभागातील प्रकल्पांमध्ये ६०.१२ टक्के पाणीसाठा झाला आहे. अप्पर वर्धा धरणात ८३.७०

टक्के पाणीसाठा झाला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात आतापर्यंत ५४० मिमी पाऊस झाला आहे. या धरणातून २४ क्यूसेक विसर्ग सुरू आहे. बेंबळा प्रकल्पात ४८.९१ टक्के पाणीसाठा झाला आहे. या धरणातून ८४ क्यूसेक पाणी सोडण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात १ जूनपासून ६५४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. पेंच तोतलाडोह प्रकल्पात ८९.५१ टक्के पाणीसाठा झाला असून ६३.३७ क्यूसेक विसर्ग सुरू आहे.

******